महापालिका आयुक्त यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.: मआ/माव्य/१५६३
दिनांक : ०१/०६/२०२२

-: **कार्यालयीन आदेश** :-

**विषय** - पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता बांधण्यात येणाऱ्या इमारतींच्या बांधकाम करणेपूर्वीच्या कार्यपद्धतीबाबत.

माझे असे निदर्शनास आले आहे की, पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता बांधण्यात येणाऱ्या वास्तूंचे वाटप/ हस्तांतरण करताना सदर विभागाची वास्तूविषयक निकड विचारात न घेता भवन रचना विभागाकडून अथवा संबधित आमदार निधी, 'स' यादीमधून मोकळया/ आरक्षित जागी बांधकाम करून विकसित करण्यात येतात.

परंतु विविध विभागांकरिता बांधण्यात आलेल्या वास्तूंचे/ मिळकतींचे हस्तांतरण भवन रचना विभागाकडून मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे व मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून संबंधित विभागाकडे (उदा. समाज विकास विभाग, क्रीडा विभाग, सांस्कृतीक विभाग, क्षेत्रीय कार्यालय, अग्निशमन विभाग, प्राथमिक शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, इ.) यांना हस्तांतरित करण्यात येते व तद्नंतर संबधित विभागाकडून त्या मिळकतीचा विनियोग करण्यात येतो, अशी कार्यपद्धती अस्तित्वात आहे.

तथापि, सदर वास्तूंची संबधीत विभागाकडून मागणी नसल्याने व संबधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नसल्याने सदर वास्तू / बांधीव मिळकती संबंधित विभागांकडून ताब्यात घेण्यास नकार दिला जातो व त्या वास्तू विनावापर रिक्त राहतात. त्यामुळे सदर मिळकतींमध्ये अतिक्रमण होण्याची किंवा त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे महानगरपालिकेने बांधकामासाठी खर्च केलेल्या निधीचा अपव्यय होतो व विनियोगाअभावी सदर मिळकती विनावापर पडून राहत असल्याने वास्तूंचे जतन व संरक्षण व्यवस्थितरित्या करता येत नाही व पर्यायाने महापालिकेला आर्थिक तोशीस सोसावी लागते.

तरी, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सदर कार्यप्रणालीमध्ये सुधारणा होणे आवश्यक असून त्यानुसार यापुढे भवन रचना विभागाकडून अथवा क्षेत्रीय कार्यालयांकडून त्यांचे अखत्यारीतील कोणत्याही

Scanned with CamScanner

मिळकतीचे बांधकाम करण्यापूर्वी संबधित खात्याची सदर वास्तूविषयक मागणी आहे अगर नाही, याबाबत संबधीत खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र व प्रस्तावित इमारतीचे प्रयोजन,प्रस्तावित वापर, कर्मचा-यांची उपलब्धता, आर्थिक तरतूद व मालमत्तेच्या भविष्यातील विनियोगाचे नियोजन इ. सह सुस्पष्ट अभिप्राय प्राप्त केल्यानंतरच मिळकत विकसित करणे/बंधकाम करणेबाबतची कार्यवाही भवन रचना विभाग व सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी करावयाची आहे. सबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र वा संमती न घेता कोणत्याही वास्तू / इमारती / सुविधा क्षेत्रे विकसन केल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तसेच, संबंधित विभागाच्या संमती / ना-हरकतीद्वारे विकसित केलेली वास्तू/ इमारत पूर्ण झाल्यावर संबंधित विभागाने विनातक्रार व त्वरित ताब्यात घेणेची कार्यवाही करावी. सदर कार्यालयीन आदेशाची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची दक्षता घ्यावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रति,

सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका

प्रत – अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल/ ईस्टेटस/ विशेष)
पुणे महानगरपालिका
यांस माहितीस्तव . . . .



Scanned with CamScanner